महासागर अमरावती

मंगळवार, दि. 11 मार्च 2025

पान 3

## सहाय्यक कामगार आयुक्तांची खुर्ची फेकली



**अमरावती**– सहा महिन्यांपासून सहाय्यक कामगार आयुक्तच कार्यालयात नसल्याचा आरोप करत प्रहार संघटनेने त्यांची खुर्ची आणि पाटी कार्यालयाबाहेर काढत सोमवारी (दि.10) आंदोलन केले. शहरातील कामगार उपायुक्त कार्यालय येथे सहा महिन्यापूर्वी मो. अ. सय्यद हे सहाय्यक कामगार आयुक्त म्हणून रुजू झाले. सहाय्यक कामगार आयुक्त हे सुरक्षारक्षक मंडळाचे अध्यक्ष देखील असतात. मात्र रुजू झाल्याच्या दुसऱ्याच दिवसांपासून ते रजेवर गेल्याचा आरोप करत प्रहार जशक्ती कामगार संघटनेने सोमवारी आंदोलन (दि.10) केले. सुरक्षारक्षक मंडळाला अध्यक्ष नसल्याने मागील सहा महिन्यांपासून सुरक्षा रक्षकांचे अनेक प्रश्न कार्यालयस्तरावर प्रलंबित आहेत. त्यामुळे संघटनेच्या वतीने ते रुजू व्हावे यासाठी अनेकवेळा निवेदन कामगार उपायुक्त कार्यालयाला देण्यात आले होते. तसेच सोमवारी ते रुजू होणार असल्याचे देखील सांगण्यात आले होते. मात्र सोमवारी देखील मो. अ. सय्यद रुजू झाले नसल्याने संतप्त प्रहार संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आक्रमक होऊन कार्यालयातील सहाय्यक कामगार आयुक्तांच्या नावाची पाटी तसेच त्यांची खुर्ची फेकून निषेध केला.

# खरोखर बलाढ्य की, नुसता फुसका बार!

### अर्थसंकल्पाबद्दल कोण काय म्हणाले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.10 )**– राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधिमंडळात अर्थसंकल्प सादर केला. अजित पवार यांनी शेतकरी, महिला तसेच अन्य क्षेत्रांसाठी मोठ्या घोषणा केल्या. तसेच यापुढे आता 3 ऑक्टोंबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची मोठी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे अभिजात मराठी भाषेच्या संशोधन व अध्ययनासाठी उच्च दर्जाचे संशोधन केंद्र तसेच अनुवाद अकादमी स्थापित करण्यात येणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली. हा अर्थसंकल्प खरोखर बलाढ्य आहे, की नुसता फुसका बार आहे, यावर अनेकांनी आपल्या प्रतिक्रीया 'दैनिक महासागर' ला दिल्या.



### शिळ्या कढीला उत



हा अर्थसंकल्प शिळ्या कढीला उत आणण्याचा प्रकार महायुती सरकारने केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारकाचं काय झालं हे शासन सांगणार आहे का? आज नवीन स्मारकांची घोषणा करून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न अजितदादांनी केला आहे. लाडक्या बहिणींच्या तोंडाला पानं पुसण्याचं काम सरकारने आज केलं. आहे त्या योजनेसाठी पुरेसा नियतव्यय नाही, उलट लाभार्थ्यांची संख्या कमी करण्याचा डाव या अर्थसंकल्पात दिसतो. पायभूत सुविधांबाबत सरकारचा सगळा भर मुंबई-पुण्यावर दिसतो. बाकीचा महाराष्ट्र या सरकारच्या लेखी अस्तित्वात नाही का? ज्या महामार्गांबाबत अर्थसंकल्पात बोललं गेलंय ते प्रकल्प भू-माफियांचे खिसे भरण्यासाठी राबवले जात आहेत. कुठलीही दिशा नसलेला कॉपीपेस्ट अर्थसंकल्प आहे.

**ॲड. यशोमती ठाकूर माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य.**

### घरात नाही दाणा, आम्हाला बाजीराव म्हणा!



अर्थसंकल्पात विविध विभागांना शेकडो आणि हजारो कोटींची तरतूद करताना आपल्या तिजोरीत खडखडाट आहे. त्याचप्रमाणे राज्य 7 लाख कोटी कर्जाच्या गर्तेत गळ्यापर्यंत रुतलेले आहे. या कडे साफ दुर्लक्ष करण्यात आलेलं आहे. लाडक्या बहिणीना निवडणुकीपूर्वी 2100 रु.देण्याचं कबूल करण्यात आले होते. परंतु आता त्यांना केवळ 1500 रु.समाधान मानावे लागण्याची चिन्हे दिसत आहे. महिला दिनाच्या दुसऱ्याच दिवशी लाडक्या बहिणीची घोर फसवणूक करण्याचा हा प्रकार आहे. निवडणुकीपूर्वी भाजप तर्फे आपल्या जाहीरनाम्यात शेतकरी बांधवांची कर्जमाफी करण्याचे जे वचन देण्यात आले होते, त्याचा साधा उल्लेख सुद्धा या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाहीये. हा अर्थ संकल्प मुंबई, पुणे, ठाणे व नागपूर या शहरांच्या विभागांपुरताच केंद्रित झाल्याचे तरतुदींवरून निदर्शनास येते. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर म्हणजेच केवळ महाराष्ट्र आहे काय. अमरावती जिल्ह्याला तर या अर्थ संकल्पात काहीच मिळालेले नाही समाजातल्या सर्वात शेवटच्या पायरीवर असलेल्या रोजगार हमीवर असलेल्या मेळघाट सारख्या दुर्गम आदिवासी, ग्रामीण भागातील मजुरीचे मागील सहा महिन्याचचे मजुरीचे 50 कोटी रु अद्यापही शासनाने दिलेले नाहीत. आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे व सगमेश्वर, तुळापुरात संभाजी महाराजांच्या नव्या स्मारकांच्या निर्माणाच्या घोषणा करण्यात आलेल्या आहेत. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारक ज्याचे भूमिपूजन खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी यांनी पाच वर्ष पूर्वी केले होते त्याला अजून विट सुद्धा लागलेली नाही. त्याबद्दलअर्थ संकल्पात तरतूद तर दूरच चकार शब्दही काढण्यात आलेला नाही. एकंदरीत मोठ मोठ्या घोषणा करून बोलाचीच कढी बोलाचाच भात असा हा अर्थसंकल्प आहे.

**-डॉ.सुनिल देशमुख, माजी अर्थराज्य मंत्री, महाराष्ट्र राज्य**

### महाराष्ट्राच्या नवनिर्माणाला दिशा देणारा अर्थसंकल्प



महाराष्ट्र 2025-26 चा अर्थसंकल्प हा समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याच्या संकल्पातून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केलेला अकरावा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणारा हा अर्थसंकल्प शेती, ग्रामविकास, महिला सशक्तीकरण, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि पर्यावरणपूरक ऊर्जेला चालना देणारा व इतरही महत्त्वाच्या बाबींना दिलेले स्थान महायुती सरकारची सर्वांगीन विकासाची कटिबध्दता दर्शविते. सर्वसमावेशी आणि दूरदर्शी अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांचे अभिनंदन.

**चेतन गावंडे, माजी महापौर, अमरावती.**

### अर्थहीन अर्थबजेट



राज्याचे जे आज अर्थ बजेट सादर त्यात असे वाटलेकी शेतकऱ्यांना कर्जमाफी होईल, आमच्या लाडक्या वहिनीला 2100 रुपये मिळतील आणि अजून काही मोठ्या घोषणा होतील. परंतु पोकळ घोषणांचा पाऊस पाडून आज हे बजेट सादर झाला आहे. जे आश्वासन निवडणुकीच्या काळात दिले होते. त्या आश्वसनाची पूर्तता झालेली दिसून येत नाही. हे बजेट जे आहे ते सर्वसामान्यांच्या तोंडाला पान पसुणारे आहे. उद्योगधंदे बाबत हसता या बजेटमध्ये दिसून येते नाही. त्यामुळे हे बजेट अर्थहीन असे आहे.

**बळवंत वानखडे**
**खासदार, लोकसभा अमरावती.**

### हा शुध्द फसवेगिरीचा अर्थसंकल्प



महाराष्ट्र अर्थसंकल्प 2025 हा सरकारचा फसवेगिरीचा अर्थसंकल्प आहे. सार्वत्रिक निराशा हाताशी आलेली आहे. कर्जमाफी, शेती अनुदान, अर्थसंकल्पावरून शेतकरी वर्गाला काहीच दिलासा नाही.शेतकरीवर्ग पूर्णपणे निराश असणारा आहे. राज्यातील वाहन मालकांना मोठा झटका यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये बसलेला आहे. आज मांडलेल्या अर्थसंकल्पात लाडक्या बहिणीसाठी नवीन योजना सरकारने आणल्या नाही. निवडणुकीपूर्वी दरमाह 2100 देण्याचे वचन महायुतीने दिले होते,त्याबाबत सुद्धा घोषणा आजच्या अर्थ संकल्पात करण्यात आलेली नाही.लाडक्या बहिणींना आश्वासन देऊन फक्त मत लुटलेली आहेत दिलेले शब्द पूर्ण करण्याची या सरकारची मानसिकता राहिलेली नाही.महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांसाठी कुठलीही शाश्वती नाही.महाराष्ट्रातील या ट्रिपल इंजिन सरकारने ज्या - ज्या घोषणा या अर्थसंकल्पात केलेल्या आहेत या सपशेल अपयशी ठरणार आहेत, कारण यांच्याकडे कुठलीही आर्थिक तरतूद नाही. संपूर्ण पैसे सत्ता वाचविण्याकरिता उधळून लावले आहे. तसेच अमरावती शहराकरिता नवीन काहीच दिलेले नाही. महाराष्ट्र अर्थसंकल्प 2025 हा सपशेल अयशस्वी अर्थसंकल्प आहे.

**बबलु शेखावत, अध्यक्ष**
**अमरावती शहर काँग्रेस कमिटी**

### या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना भोपळा



शेतकऱ्यांना विधानसभा निवडणुकीत कर्जमुक्तीचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाची सरकारने अंमलबजावणी करावी. त्याच आशेवर शेतकरी आस लावून बसले आहे. कारण शेतकऱ्यांकडे शेतीमालाला भाव नसल्यामुळे त्यांचा शेतमाल मातीमोल विकल्या गेला आहे व विकत आहे. समोर पेरणीचे दिवस आहे. बँका आधीचे कर्ज भरल्या शिवाय कर्ज देणार नाही. मग पेरणीसाठी पैसे कोठून आणायचे हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण होईल. त्या कारणाने सरकारने तात्काळ कर्जमुक्ती करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा,अन्यथा शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण वाढणार व याला सर्वस्वी जबाबदार सरकार राहील.

**प्रविण मोहोड, जिल्हाध्यक्ष अमरावती स्वाभिमानी शेतकरी संघटना**

### जनतेला न्याय देणारा अर्थसंकल्प



सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून विकासाचा समतोल साधणारा असा वर्ष 2025-2026 चा अर्थ संकल्प असून या अर्थसंकल्पात शेतकरी, शेतमजूर, महिला, नोकरदारवर्ग तसेच गरीब, दुर्बल, मागासवर्गीय व अल्पसंख्यांक घटकांच्या विकासासाठी महत्वपूर्ण अशा घोषणा करण्यात आल्या आहे. त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा महाराष्ट्राला प्रगत, उन्नत व समृद्ध करणारा असून सर्वसमावेशक जनतेला न्याय देणारा आहे. अर्थमंत्री महोदयांनी मांडलेल्या अर्थसंकल्पिय घोषणांचा अमरावतीला देखील लाभ होणार असून अमरावती बेलोरा विमानतळ येथून 31 मार्च 2025 पासून प्रवासी विमान सेवा सुरु होणार असल्याची घोषणा महत्वपूर्ण आहे. वैनगंगा -नळगंगा नदीजोड प्रकल्पाची घोषणा करण्यात आल्याने यामधून अमरावती मध्ये सिंचनाकरिता, पाणी पुरवठा व औद्योगिक वापरासाठी नदीजोड प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे. पाण्याच्या मुबलकतेमुळे अमरावती येथे औद्योगिक हब करिता मोठी संधी निर्माण होणार आहे. सोबतच राज्यात नवीन 18 न्यायालयाची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली असून अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथे नवीन न्यायालय होणार असल्याची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितपवार यांनी आपल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनातून केली आहे.

**सुलभा खोडके, आमदार विधानसभा मतदारसंघ अमरावती.**

### हे ऐतिहासिक बजेट आहे



विकसीत भारत, विकसित महाराष्ट्र हे ब्रीदवाक्य धरून सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे. शेतकरी, लाडकी बहीण, दिन दलित, अपंग, कुपोषित, दिव्यांग, अल्पसंख्यांक, मागासवर्गीय यांना धरून आर्थिक सक्षमीकरणावर भरदेणारा अर्थसंकल्प आहे. एक जिल्हा..एक उत्पादन राबविण्यात येईल. महिलांन करीता व युवा करीता कौशल्य विकास योजना राबवण्यात येईल.ऐतिहासिक, पर्यटन, तीर्थस्थान बाबींवर विशेष लक्ष वेधणारा अर्थसंकल्प सरकारच अभिनंदन करते.

**शिल्पा चौधरी पाचघरे,**
**सदस्य भाजपा महाराष्ट्र प्रदेश**

## पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविणार

**एडीजी सुनिल रामानंद**

**अमरावती** - राज्याचे अतिरिक्त पोलिस महासंचालक सुनील रामानंद यांनी 10 मार्च रोजी सकाळी 10 वाजता पोलिस मुख्यालयाला भेट दिली. त्यानंतर त्यांनी पोलिस कवायती मैदानावर, त्यांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या समस्या लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.

एडीजी सुनिल रामानंद यांनी पोलीस आयुक्तालयाला भेट देऊन वार्षिक तपासणीच्या अनुषंगाने आढावा घेतला. यावेळी पोलिस मुख्यालयात त्यांचे स्वागत पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, डीसीपी कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सागर पाटील यांनी केले. त्यानंतर त्यांनी कर्मचाऱ्यांशी चर्चा केली आणि त्यांच्या समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले. पोलीस मुख्यालयाच्या सभागृहात एडीजी रामानंद, एसआयजी रामनाथ पोकळे, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि विभागातील सर्व जिल्ह्यांच्या अधीक्षकांची बैठक बोलावण्यात आली. ज्यामध्ये विविध विषयांवर चर्चा झाली.




# अखेर विमानतळाच्या उद्घाटनाचा मुहुर्त निघाला




## ■31 मार्च पासून अमरावतीतूनही हवाई सफर
## ■अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी केले शिक्कामोर्तब

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.10 )**– विभागीय शहर असणाऱ्या अमरावतीत विमानतळ कधी सुरू होणार असा प्रश्न अनेक वर्षांपासून केला जात होता. आता येथील बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झाले असून 31 मार्च पासून प्रवासी विमानसेवा सुरू करण्याचे सरकारचे नियोजन आहे, अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी सादर केलेल्या आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात केल्यानंतर अमरावतीसह संपूर्ण विभागात आनंद व्यक्त केला जात असून, उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी केलेल्या घोषणेचे स्वागत होत आहे.

अमरावती विमानतळावर नुकतीच एअर कॅलिबरेशन ऑफ प्रिसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर अर्थात %पीएपीआय% चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यामुळे अमरावतीकरांना मुंबईपर्यंत विमानाने ये-जा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमरावती विमानतळावरून विमान उड्डाण करण्यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) परवानगी मागण्यात आली आहे. ही परवानगी आल्यानंतर इथून नियमित विमान उड्डाण सुरू होईल. दरम्यान, अमरावती विमानतळ सुरू झाल्यानंतर त्याअनुषंगाने या भागात उद्योगधंदे, रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. येत्या 31 मार्चपासून प्रवासी विमानसेवा सुरू होण्याचे संकेत अर्थमंत्र्यांनी दिल्याने आता अमरावतीकरांचे विमानसेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. या विमानतळावर पीएपीआय प्रणाली बसवण्यात आली आहे. विमान वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी ते एक आवश्यक साधन मानले जाते. धावपट्टीजवळ येणारी विमाने जवळ येताना आणि सुरक्षित लँडिंगसाठी योग्य ग्लाइड उतार राखण्यासाठी ते आवश्यक आहे. पीएपीआय प्रणालीचे कॅलिब्रेशन विमानतळाच्या पायाभूत सुविधांचा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. ते आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक सुरक्षा मानकांनुसार करण्यात आले आहे.

### 72 आसनी विमानही उडतील

अमरावती विमानतळावर नवीन धावपट्टी तयार करण्यात आली आहे. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. 18 बाय 50 मीटरची ही धावपट्टी आहे. त्यामुळे येथून एटीआर हे 72 आसनी विमान उडू शकणार आहे.हवाई वाहतूक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली बंगळुरूहून अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर उड्डाण केलेल्या बीच एअर 360 ईआर टर्बोप्रॉप विमानावर भारतीय विमानतळ प्राधिकरण, फ्लाइट इन्स्पेक्शन युनिटने कॅलिब्रेशन केले. या विमानाने 26/08 धावपट्टीवरून अमरावती विमानतळावरून उड्डाण केले आणि त्याचे कॅलिब्रेशन यशस्वीरित्या पूर्ण केले.

### अलायन्स एअर या कंपनीची विमानसेवा

पॅसेंजर टर्मिनल बिल्डिंग, एटीसी टॉवर्स आणि इतर नागरी कामे पूर्ण झाली असून, अमरावतीहून लवकरच पूर्ण व्यावसायिक उड्डाणे सुरू होण्यापूर्वी गेल्या काही सुरक्षा विषयक तपासण्या केल्या जात आहेत. प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजनेअंतर्गत मुंबई - अमरावती - मुंबई मार्गावर अलायन्स एअर या कंपनीच्या माध्यमातून एटीआर 72 आसनी विमान सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यालय कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर**

ई-मेल पत्ता :- achapur.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- ०७२२३ २२०२६०

**निविदा सुचना क्रमांक ९४/निली/२०२४-२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर दुरध्वनी क्रमांक ७२२३ २२०२६० हे राज्यपाल, महाराष्ट्र शासन ह्यांच्या वतीने खालील कामांचे ब-१ नमुन्यातील ऑफलाईन निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahapwd.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | चिखलदरा नगर पालिका अंतर्गत डॉ. आंबेडकर गार्डन समोरून अमोल पांडे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे. | ७९५१९३.०० |
| २ | चिखलदरा नगर पालिका अंतर्गत गल्ली क्र. १,२,३ येथे कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम करणे. | ७९५१९३.०० |
| ३ | चिखलदरा नगर पालिका अंतर्गत मरीयमपूर जाणाऱ्या रस्त्यालगत सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे. | ७९५३५८.०० |
| ४ | चिखलदरा नगर पालिका अंतर्गत मरीयमपूर येथे होली क्रॉस शाळेच्या मागे सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे. | ७९५३५८.०० |
| ५ | चिखलदरा नगर पालिका अंतर्गत मरीयमपूर जाणाऱ्या रस्त्यावर फिलीस यांच्या रस्त्यालगत सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे. | ७९५३५८.०० |
| ६ | विरूळपूर्णा ता. चांदूर बाजार येथे सभागृह बांधकाम करणे. | ८३२७४१.०० |
| १ | ऑफलाईन निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि.११.०३.२०२५ @ १०.०० वाजता ते १८.०३.२०२५ @ १७.०० वाजता |
| २ | निविदा पुर्व बैठक स्थळ, दिनांक व वेळ | निरंक |
| ३ | निविदाकारांनी ऑफलाईन निविदा तयार करण्यासाठी ( तांत्रिक व आर्थिक निविदा) निविदेची हार्ड कॉपी सादर करण्याचा ठिकाण, दिनांक व वेळ | ऑफलाईन निविदा बाबतची हार्ड कॉपी (तांत्रिक लिफाफा) सीलबंद लिफाफ्यामध्ये दि.२०.०३.२०२५ @ १७.०० वाजतापर्यंत निवीदे नुसार कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. |
| ४ | ऑफलाईन तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांचे कार्यालयात दि. २१.०३.२०२५ @ १०.०० ते @ वाजेपर्यंत ऑफलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ऑफलाईन-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे
१) http://mahapwd.gov.in
(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर कार्यालयातील सूचना फलक
जा.क्र.१४०९/निली./२०२४-२०२५/दि. ०६/०३/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर

**( प्रमोद बा. वानखडे )**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकम विभाग,**
**अचलपूर**

**जिमाका/अम./जाहि./१९१/२०२५**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# दुचाकी चोरी प्रकरणातील आरोपी अटक

## रहीमापुर पोलीसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )** - दुचाकी चोरी प्रकरणातील एका आरोपीला रहिमापूर पोलिसांनी 10 मार्च रोजी अटक केली. विक्रम संजय वानखेडे (28, रा. मलकापुर, ह.मु.विठ्ठलवाडी, मुंबई) असे आरोपीचे नाव आहे. त्याने दुचाकी चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.

रहीमापुर पोलिस ठाण्यात दुचाकी चोरीचा गुन्हा नोंद झाला होता. या गुन्ह्याचा तपासात रहिमापूर पोलिसांनी गुप्त माहितीवरून आरोपी विक्रम संजय वानखेडेला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याने अंजनगाव पोलीस स्टेशन हद्दीतील दुचाकी चोरीची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्ह्यातील दुचाकी जप्त केल्या. तसेच आरोपने अमरावती शहर तसेच अकोट येथून दुचाकी चोरी केल्याची शक्यता आहे. त्यामुळे रहीमापुर पोलीस आरोपीची चौकशी करीत आहेत. सदर कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमाक्त, उपविभागीय पोलीस अधिकारी सिध्देश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार अनंत बड्तफर यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक अनिल कवीटकर, पोलीस अमलनदार नागोराव जरूळकर, आदोनाथ खाडे, मंगेश थोरात यांनी केली आहे.

# कांदा वाणाच्या विश्वासाहार्तेवर प्रश्नचिन्ह

## कांदा उत्पादक शेतकरी सापडला अडचणीत



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 10 )** - परतवाडा येथील एका केंद्रातून शेतकऱ्यांनी रब्बी हंगामासाठी कांद्याचे बी विकत घेऊन पेरणी केली होती. परंतु त्याला गोल आकार न आल्याने

शेतकरी अडचणीत सापडले आहेत. लांबलचक तैयार झालेला कांदा व्यापारी खरेदी करण्यास नकार देत असल्याने गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकरी रवींद्र चौर, प्रफुल दखणे व रवींद्र डांगरे यांनी री हंगामात पांढया कांद्याची पेरणी करण्याकरिता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या परतवाडा केंद्रातून सप्टेंबर 2024 उपायोजना करतात आणि पुन्हा परिस्थिती जैसे थे राहते. मेळघाट मधील खडीमल, माखला, चुनखडी, हातरू, नवलगाव, बिच्छूखेडा, सोनापूर, सलिता, सुमिता, पाचडोंगरी, मोथा बासह अनेक गावांत तसेच विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदरा शहरात सुद्ध पाण्याची तीव्र टंचाई असते, या दरम्यान बियाणे विकत घेतले होते. ऑक्टोबर महिन्यात शेतावर ट्रॅक्टरद्वारे पेरणी केली होती. सदर बियाणे उगवून झाल्यानंतर योग्यप्रकारे जोपासना केली, पण बियाणे उगवल्यावर पिकाची वाढ झाली नाही. त्यामुळे कांदा हा आकार घेत नसून गाजराप्रमाणे उंच होत असल्याचे लक्षात आले. निर्धारित रकमेवर करार करून लागवडीच्या शेतात कांदा पेरणी करण्यासाठी पंधराशे रुपये प्रति किलोप्रमाणे बियाणे विकत घेणे, शेत तयार करणे, ट्रॅक्टरद्वारे पेरणी करणे, खत देणे, तणनाशक व इतर आवश्यक फवारणी करणे, पाणी देणे यासर्व बाबींवर शेतकऱ्यांना सुरवातीपासून शेवटपर्यंत साठ हजार रुपयांचा प्रति एकरच्या जवळपास खर्च आला आहे. चार महिन्यांच्या परिश्रमानंतर कांदा

काढणी केली असता तो खालच्या बाजूला कमी गोलाकार असून त्याची दांडी जाडी तयार झाली आहे. त्यामुळे शंभर किंटल प्रती एकराच्या उत्पादनावर पाणी फिरल्या गेले, सदरचे उत्पादन केवळ बीस क्विंटलच्या जवळपास येऊन ठेपले आहे. तेही निघालेला कांदा व्यापारी घेण्यास तयार नाहीत. पनोट, कोपरा, भिलोमा व जवळापूर येथील असंख्य शेतकन्यांना या बियाण्यांचा फटका बसला असून याबाबतची तक्रार

उपविभागीय कृषी अधिकारी यांच्याकडे केली आहे. आता या बाबत कृषी विभाग काय दखल घेते या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महामार्गावरील धोकादायक गतिरोधकामुळे अपघाताची शक्यता

## गतिरोधकांच्या नूतनीकरणाची मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.10 )** - मोर्शी शहरातून जाणाऱ्या अमरावती-वरुड या राष्ट्रीय महामार्गावरील अनेक गतिरोधकांची दुर्दशा झाल्याने, हे गतिरोधक धोकादायक ठरत आहेत. त्यामुळे या मार्गावर अपघातांची शक्यता वाढली आहे. अशा गतिरोधकांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. त्यासोबतच या मार्गावर सतत वर्दळ राहणाऱ्या ठिकाणांवर नव्याने गतिरोधक बसविण्याची मागणी सुद्धा केली जात आहे.

मोर्शी शहरातून अमरावती-वरुड हा 353 क्रमांकाचा महामार्ग जातो. या मार्गावर माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी समोर चौफुली आहे. या चौकातून मोठी वाहने भरधाव वेगात जातात. गतिरोधक नसल्याने वाहनचालक वेगावर नियंत्रण ठेवत नाहीत. त्यामुळे येथे सतत अपघात घडत आहे. अपघात टाळण्यासाठी या चौफुलीवर गतिरोधक बसविण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. मोर्शी येथील दक्ष नागरिक ॲड. आशिष ठाकरे यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अमरावती येथील कार्यकारी अभियंत्यांना याबाबत लेखी तक्रारही केली आहे. परंतु अद्याप त्याची दखल घेण्यात आली नाही. याठिकाणी नुकताच एका शाळकरी मुलीचा अपघात झाल्यानंतर गतिरोधकाची मागणी जोर धरू लागली. या मार्गावरच शहरातील सर्व प्रमुख शासकीय कार्यालय, मंगल कार्यालय, शाळा, महाविद्यालय तसेच बाजारपेठ आहे. त्यामुळे सतत रहदारी असते. या मार्गावरील जुने गतिरोधक ज्यांची दुर्दशा झाली आहे, त्याची दुरुस्ती करून आवश्यक त्या ठिकाणी नवीन गतिरोधक बसविण्याची मागणी ॲड. आशिष टाकोडे यांनी केली आहे.

# भारतीय बौद्ध महासभा तर्फे भातकुली तहसीलसमोर निदर्शने



**महासागर प्रतिनिधी**
**खोलापूर( दि. 10 )** - भारतीय बौद्ध महासभेतर्फे भातकुली तहसिल कार्यालयासमोर महाबोधी महाविहार मुक्तीसाठी (दि.8) निदर्शने करून निवेदन देण्यात आले. बिहारमधील बोधगया येथील महाबोधी महाविहार हे बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावे, ते सध्या ब्राम्हणांच्या ताब्यात आहे. बौध्दगया मंदिर कायदा 1949 रद्द करून ते बुध्दविहार अखिल भारतीय बौध्द भिक्खू संघाच्या ताब्यात देण्यात यावे, अशी मागणी यावेळी भारतीय बौद्ध महासभा यांच्या तर्फे करण्यात आली. महाबोधी महाविहार मध्ये बौद्ध भिक्षु यांच्या ठिकाणी ब्राम्हण समाजातील पंडितांना बसविण्यात आले आहे. देशात असलेल्या प्रत्येक धर्माच्या धर्म स्थळावर त्या धर्माच्या लोकांचा ताबा आहे. एकमेव बौद्ध धर्माच्या बुद्ध विहारावर मात्र आजही ब्राम्हण समाजाचा ताबा आहे. त्यामुळे हा बौद्ध धर्मावर अन्याय आहे,असे निवेदनात नमुद आहे. त्यामुळं 1949 चा बिहार टेम्पल ॲक्ट कायदा रद्द करून महाबोधी बुद्धविहार हे बौद्ध भिक्षु यांच्या ताब्यात देण्यात यावे,अशी मागणी करण्यात आली. यावेळी समाजबांधव पुरुष, महिला अनुयायी व भारतीय बौद्ध महासभेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### सावंगा विठोबा येथे...

# रोज जाळतात किमान 10 किलो कापूर



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार( दि. 10 )** - चांदूर रेल्वे तालुक्यातील 1600 लोकवस्ती असलेल्या सावंगा विठोबा गावाला कापुराचे गाव अशी ओळख मिळाली आहे. कारण, येथे दररोज किमान 10 किलो कापूर जाळला जातो. तर गुढी पाडव्याला येथील श्रीकृष्ण अवधूत महाराज संस्थानात मोठी यात्रा भरते. या वेळी किमान 12 किंटल कापूर उजळला जातो. ही परंपरा 350 वर्षापासून सुरू आहे.

या परंपरेने येथील बऱ्याच गावकऱ्यांना रोजगार दिला आहे. गुढी पाडव्याला श्रीकृष्ण अवधूत महाराज संस्थान सावंगा विठोबा येथे भरणारी यात्रा विशेष असते. या कालावधीत मंदिरात समांतर असलेल्या दोन लाकडी ध्वज खांबांना त्यावर पाय न ठेवता खोळ चढवली जाते. तसेच एकाच दिवशी 12 किंटल कापूर जाळला जातो. जिल्ह्यासह राज्य व देशभरातून गुढी पाडव्याला किमान 4 लाख भाविक दर्शनाला देत असतात, अशी माहिती संस्थानद्वारे देण्यात आली. 350 वर्षाआधी कृष्णाजी महाराज यांनी कापूर जाळण्याची परंपरा सुरू केली, ती पुनाजी महाराज यांनीही पुढे सुरू ठेवली. त्यामुळे ती अजूनही अव्याहतपणे सुरू असून यात गावातील भाविकां सह देशभरातील भाविकांचे योगदान असते.

आठवडयातील बुधवार व रविवारी येथे मोठ्या प्रमाणात कापूर जाळला जातो. एवढेच नव्हे तर दर अमावस्येला चंदन उटी सोहळ्यातही भाविकांकडून कापूर प्रज्वलित केला जात असतो. त्यामुळे सावंगा विठोबा गावाला कापुराचे गाव अशी ओळख मिळाली आहे. येथे दरवर्षी नियमितपणे शेकडो किंटल कापूर जाळला जात असल्यामुळे हा कापूरच आता येथील गावकऱ्यांच्या उत्पन्नाचे साधन बनले आहे. अनेक भाविक स्वत:सोबत कापूर आणत नाही, तर येथेच तो किलोने खरेदी करतात.

### कापुराचे गाव म्हणून ओळख

जेव्हापासून या गावातील मंदिरात कापूर जाळला जातो. तेव्हापासून येथे कापुराची विक्री केली जाते. त्यामुळे गावात प्रवेश करताच कापुराचा सुगंध नाकात शिरतो. या कापुराच्या सुगंधामुळे गावातील वातावरणही शुद्ध राहते. त्यामुळेच या गावाला कापुराचे गाव असे नाव मिळाले आहे.

# ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची भरारी

## नोएडा येथील राष्ट्रीय युवा मोहोत्सव मध्ये मिळविली पदके



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )**- नोएडा येथील अमेठी युनिव्हर्सिटी मध्ये 3 ते 7 मार्च, 2025 दरम्यान पार पडलेल्या 38 व्या राष्ट्रीय युवा महोत्सवात ( ऑल इंडिया युनिव्हर्सिटी युथ फेस्टिवल) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करून अमरावती येथील प्रसिद्ध ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी तृतीय पारितोषिक पटकाविले. जवळजवळ 148 विद्यापीठांमधील साडेतीन हजार विद्यार्थ्यांमध्ये ब्रजलाल बियाणी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.प्रगती सुधा व प्रथमेश अडाळगे यांनी अनुक्रमे पोस्टर मेकिंग या कलाप्रकारात व पाश्चिमात्य एकल वादन या कला प्रकारात कांस्यपदक पटकावले. या विद्यार्थ्यांनी आपल्या कला- कौशल्य तसेच जिद्द व मेहनत याच एक उत्तम उदाहरण देऊन आदर्श निर्माण केला. या यशासाठी या विद्यार्थ्यांचं सर्व दूर कौतुक होत आहे.

राष्ट्रीय पातळीवर तृतीय पारितोषिके पटकावून, ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपली सांस्कृतिक व कलाप्रकाराची प्रचिती देत, यश संपादन केले. या चमूमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा गौरव वाढविला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दीपक धोटे, सुरज हेरे, महाविद्यालयाचे युवा महोत्सव चमू व्यवस्थापक डॉ. सागर कुथे व डॉ. मृणाल महाजन यांचे अमूल्य मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभले. सांस्कृतिक स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळालेल्या सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे आणि विजेत्यांचे श्री ब्रजलाल बियाणी शिक्षा समितीचे अध्यक्ष ओम लढ्ढा व सर्व कार्यकारी सदस्यांनी अभिनंदन केले.

# अपंग मूकबधिर विद्यालयात शैक्षणिक साहित्य व औषधी वाटप

## डॉक्टर असोसिएशन वुमेन विंग्सचा महिला दिनानिमित्य उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.10 )** - चांदूर रेल्वे शहरातील डॉक्टर असोसिएशन वुमेन विंग्सतर्फे महिला दिनानिमित्य अपंग मूकबधिर सेवा संस्थान निवासी विद्यालय, सोनगाव येथे भेट देऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, भेटवस्तू व औषध वाटप करण्यात आले. यावेळी वुमेन विंग्सच्या डॉ. अनुया ढोले, डॉ. आकांशा अंदुरे, डॉ. श्रृती वाघ, डॉ. सुषमा खंडार ह्या उपस्थित होत्या. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सोनाली भोयर यांचा महिला दिनानिमित्त वुमेन विंग्सतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व महिला डॉक्टरांनी महिला सबलीकरण ही काळाजी गरज असल्याचे सांगत शिक्षकांशी संवाद साधला. तसेच डॉ. अनुया क्रांतिसागर ढोले यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना नियतीची साथ नसतांना प्रतिकूल परिस्थितीत खंबीरपने उभं राहून संघर्ष कसा करायचा हे आपल्याला शिकायला मिळते असे सांगितले. या उपक्रमात सौरभ करमोरे, प्रणाली चवरे यांचे सहकार्य मिळाले. यावेळी विद्यालयाचे शिक्षक संदीप लांजेवार, शीतल ढोरे, सोळंके, सुतवने, कर्मचारी वृंद प्रफुल मंगळे, लांजेवार, निरुपाला लांजेवार, सुजाता तायडे, शुभम निर्मळ व मीनल थर्डक आदी उपस्थित होते.

# धारणी ते तलई रस्त्याची दयनीय अवस्था

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी ( दि. 10 ).** धारणी पासून दोन किमी अंतरावर असलेल्या तलई गावाला जाणार्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यावरून वाहन चालविणे कठीण झाले आहे. अनेकांचे या रस्त्यावर अपघात झाले आहे. रस्त्यावर खड्डा की खड्यात रस्ता हे अद्याप समजले नाही. दळणवळणाच्या दृष्टीने येथील गावकऱ्यांना दररोज धारणी येथे यावे लागते. सोबतच टाकरखेडा व चिखलपाट तलई येथील लोकांना व विद्यार्थ्यांना नियमित शाळेत यावे लागते. या रस्त्याने मुलांना सायकल चालविणे कठीण झाले आहे. बरेचदा अनेक विद्यार्थ्यांना अपघातांना सामोरे जावे लागते. दररोज नवनवीन अपघातांची श्रृंखला असते. याबाबत वेळोवेळी शासनाला गावकऱ्यांनी निवेदन देऊन रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली. मात्र त्या मागणीला शासनाने गांभीर्याने घेतले नाही. तलाई , टाकरखेडा व चिखलपाट या गावातील गावकऱ्यांनी लवकरात लवकर रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली आहे.

# विज्ञान प्रदर्शनीत रुद्रेश जामठे प्रथम

## श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान दिन



**महासागर प्रतिनिधी**
**टाकरखेडा संभू,( दि. 10 )** -श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रथम क्रमांक रुद्रेश जामठे, द्वितीय क्रमांक कनिष्का माहोरे, तृतीय क्रमांक धनश्री लांडगे यांनी पटकाविला.

श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक उमेश सोलव यांनी प्रसिद्ध नोबेल पारितोषिक शास्त्रज्ञ सी.व्ही.रामन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. शाळेच्या शिक्षिका सविता बेलसरे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकार करण्याचा सल्ला दिला. एक दिवसीय विज्ञान प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी 15 मॉडल सादर केले. यामध्ये प्रथम क्रमांक रुद्रेश जामठे, द्वितीय क्रमांक कनिष्का माहोरे, तृतीय क्रमांक धनश्री लांडगे, प्रोत्साहनपर बक्षीस सुमित गुल्हाने या विद्यार्थ्यांना देण्यात आले. विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा, प्लास्टिक पर्यावरण मुक्त, लाईट ऑफ रिफ्लेक्शन अशाप्रकारे विविध प्रयोग केले. कार्यक्रमाचे संचालन इयता सातवीची विद्याथीनी अक्षरा शेंडे हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीकरिता शाळेतील शिक्षक अतुल घुरडे, प्रशांत मालवे दीपक हंबर्डे, सुनंदा देशमुख यांनी परिश्रम घेतले.

# वीज थकबाकी 248 कोटी; वसूली मात्र फक्त 29 कोटी

## मुख्य अभियंतांच्या मार्गदर्शनात 'मिशन 21 डे' ला प्रारंभ ■ दर दिवसाला 10 कोटी रूपये वसुलीचे उद्दिष्ट



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 10 )** - वापरलेल्या विजेचे पैसे वेळेवर भरण्यास ग्राहकांकडून टाळाटाळ होत असल्याने महावितरणच्या अमरावती परिमंडळाची एकूण थकबाकी 248 कोटी रुपयांवर पोहोचली आहे. तथापि, या आर्थिक वर्षातील मार्च हा शेवटचा महिना असुनही गेल्या 9 दिवसात फक्त 29 कोटी रूपयेच वसूल झाले आहे. त्यामुळे उर्वरित थकबाकी वसुलीकरीता परिमंडळात 'मिशन 21 डे' ला सुरूवात करण्यात आली असून मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात विभाग निहाय उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे. तसेच क्षेत्रीय पातळीवर होणाऱ्या कारवाईचा दररोज आढावा घेण्यात येत आहे.

अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्या अंतर्गत घरगुती,वाणिज्यिक,औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडील 219 कोटी रूपयाच्या वीज देयकाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी 'मिशन 21 डे' अंतर्गत 'थकित वीज बिल भरा अथवा वीज पुरवठा खंडित' मोहिम तीव्र करण्यात आली आहे.31 मार्च पर्यंत 219 कोटी रूपये वसुल करण्यासाठी प्रतिदिन अंदाजे 10 कोटी रूपये वसुल करावे लागणार आहे. त्यामुळे वीजबिल भरण्याला प्रतिसाद न देणाऱ्या ग्राहकाचा वीज पुरवठा खंडितच होणार आहे. संपूर्ण वीजबिल आणि पुन जोंडणी शुल्क (सींगल फेज ग्राहक 310 रूपये आणि 3 फेज ग्राहक 520 रूपये अधिक जी.एस.टी.) भरल्याशिवाय त्या ग्राहकाचा वीज पुरवठा सुरु न करण्याचे निर्देश मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी दिले आहेत. 'मिशन 21 डे' अंतर्गत अमरावती जिल्ह्यातून 103 कोटी रुपये आणि यवतमाळ जिल्ह्यातून 115 कोटी रूपये इतक्या थकबाकीची वसुली करावी लागणार आहे. त्यासाठी मुख्य अभियंत्यासोबत अधीक्षक अभियंता अमरावती दीपक देवहाते आणि अधीक्षक अभियंता यवतमाळ प्रवीण दरोली ठिक-ठिकाणी अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत वसुली मोहिमेत सहभागी होत आहेत.

### सार्वजनिक सुट्टीत सुरू राहणार वीज बिल भरणा केंद्रे

महावितरणचे कर्मचारी वीजबिल वसुलीसाठी ग्राहकांच्या दारात पोहोचत आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी महावितरणची वीजबिल भरणा केंद्रे कार्यालयीन वेळेत सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. तसेच ग्राहकांना महावितरण मोबाइल ॲप, महावितरण संकेतस्थळ यासोबत ऑनलाइन वीजबिल भरण्याचे सर्व पर्याय/सोय उपलब्ध आहे. त्यामुळे सर्व वीज ग्राहकांनी वीज देयक वेळेवर भरून महावितरणला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# चुरणी ला व्हावे नवे पोलीस स्टेशन!

## कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने होईल सोयीस्कर




**मारोती पाटणकर**
**चुरणी,( दि.10 )** - चिखलदरा तालुक्यात चिखलदरा शहरानंतर सर्वात मोठे गाव जर कोणते असेल तर ते चुरणी आहे. 40 ते 50 गावांची प्राथमिक बाजारपेठ म्हणून चुरणीची ओळख आहे. या ठिकाणी पोलीस स्टेशन झाल्यास चिखलदरा पोलिसांवर येणारा ताणही कमी होईल आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने सोयीस्कर होईल.

चुरणी, हतरुसह परिसरातील सर्व ग्रामस्थांना फौजदारीसंबधी कोणतेही काम असल्यास त्यांना 100 ते 150 किलोमीटरचे अंतरावर चिखलदरा येथे जावे लागते. या भागात दळणवळणाच्या सुविधा नाहीच्या बरोबरच आहे. एस.टी. महामंडळाच्या गाड्या वेळेवर मिळत नाहीत. खाजगी बसेस सुद्धा नसतात. अशा परिस्थितीत तक्रार द्यायची झाल्यास ज्या दिवशी घटना घडली त्याच्य दिवशी तक्रार होईल की नाही, याची शाश्वती नसते. कधी-कधी दुसऱ्या दिवशी तक्रार द्यावी लागते, अशी परिस्थिती आजही या भागाची आहे. चुरणी या गावाची लोकसंख्या पाच हजाराच्या जवळपास असून या गावांमध्ये जर पोलीस स्टेशन झाले तर या भागातील 40 ते 50 गावातील नागरिकांना चुरणी येथे येथे सोपे जाईल. न्याय मिळवण्यासाठी या भागातील नागरिकांची फरफट थांबेल.

### अवैध धंद्यांना बसेल चाप

चूरणी, हतरु, डोमा, काजलडोह, भांडुम ही सगळी गावे मध्यप्रदेशाच्या सीमेलगत आहे. मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणात अवैध धंदे, अवैध वाहतूक, बहुमूल्य वनसंपत्तीची तस्करी असे अनेक प्रकारच्या अवैध धंदे या परिसरात चालतात. चुरणी येथे पोलीस स्टेशन झाले तर या ठिकाणची न्यायव्यवस्था सुधारेल. अवैध धंद्यांना आळा बसेल. सामान्य आदिवासी बांधवांना आदिवासी तांडा वस्त्यांना न्याय हक्क मिळेल. त्यामुळे चुरणी येथे पोलीस स्टेशन व्हावे अशी या भागातील जनसमान नागरिकांची मागणी आहे.

चुरणी गावात पोलीस स्टेशन झाले तर या भागातील नागरिकांना न्यायव्यवस्था सुरळीत होईल आणि 40 ते 50 गावातील नागरिकांना न्याय मिळण्यास सुखरूप होईल आणि या भागातील अवैध धंद्याना आळा बसेल.

**सुमित चावरे,**
**भाजप, संयोजक युवा मोर्चा मेळघाट विधानसभा.**

# घराशेजारील अतिक्रमणाविरोधात दिव्यांगाचे बेमुदत उपोषण




**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.10 )**- शहरातील वार्ड क्र.3 मध्ये आपल्या घराजवळ शेणखताचा उकिरडा टाकुन आणि टीनपत्रे लावून अतिक्रमण केल्याच्या विरोधात आजपासून (दि.10) नगरपरिषद कार्यालयासमोर आपल्या आंधळ्या मुलासह एका वृध्द मातेने बेमुदत उपोषण छेडले आहे. जोपर्यंत अतिक्रमण हटविले जाणार नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार असल्याचा ठाम निर्धार उपोषणकर्त्यांनी घेतला आहे.

शहरातील रामजीबाबा मंदिरालगत वार्ड क्र.3 येथे किशोर पाटील आणि त्यांची वृद्ध आई ललिता पाटील यांच्या घराशेजारी 15 फूट रस्ता आहे. मात्र सन 2019 पासून शेजारिल व्यक्तींनी त्या रस्त्यावर शेणखताचा उकिरडा आणि टीनपत्रे लावून तो रस्ता बळजबरीने ताब्यात घेतला. त्या ठिकाणी पक्क्या स्वरूपाचे बांधकाम सुरू केले आहे. गोहाड यांनी शेणाचा उकिरडा टाकून तर क्षीरसागर यांनी टीनपत्रे लावून अतिक्रमण करत रस्ता बंद केल्यामुळे जाण्या येण्यास मोठा अडथळा निर्माण झाला आहे. जाण्या-येण्याच्या रस्त्यावर शेणाचा उकिरडा टाकल्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या प्रकारामूळे विविध आजारांना त्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषत: किशोर पाटील हे 100 टक्के नेत्रहीन दिव्यांग असून त्यांना केवळ वृद्ध आई आहे. किशोर पाटील यांच्या नावाने पंतप्रधान आवास योजनेचे घरकुल मंजूर झाले आहे. मात्र रस्ता बंद केल्यामुळे त्यांना बांधकाम करण्यास अडचण निर्माण झाली आहे. या संदर्भात सन 2019 पासून त्यांनी जिल्हाधिकारी, पालकमंत्री, नगरविकास मंत्रालय आणि मुख्याधिकारी नगरपरिषद मोर्शी यांच्याकडे तक्रार दाखल केली असून सातत्याने पाठपुरावा केला आहे. प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

यापूर्वी 22 जानेवारी रोजीही त्यांनी उपोषण सुरू केले होते, मात्र मुख्याधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्यानंतर ते मागे घेण्यात आले. परंतु त्यानंतरही कोणतीही कारवाई न झाल्याने पुन्हा एकदा 10 मार्चपासून नगरपरिषद कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले. प्रशासनाने त्वरित हे अतिक्रमण हटवून दिव्यांग कुटुंबाला न्याय द्यावा.अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे. या अन्यायाविरोधात जनआंदोलन छेडण्याचा इशारा सुद्धा देण्यात आला आहे.

# सर्वागीण विकासासाठी आर्थिक स्तर उंचाविणे गरजेचे-डॉ.पंकजा इंगळे

## डॉ. पं. देशमुख विधी महाविद्यालयात महिला सन्मान, कृतज्ञता सोहळा



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )** - महिलांना आपला सर्वांगीण विकास करायचा असेल तर पहिले आपला आर्थिक स्तर उंचावा लागेल, असे प्रतिपादन डॉ .पंकजा इंगळे यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात महिलांचा सन्मान व कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या.

स्त्रियांना हतोत्साहित करणारे वर्तन करून, त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्वाची वागणूक स्त्रीजातीला मिळत राहिली आहे. या बाबी लक्ष्यात घेता महिलांनी स्वत: चे आयुष्य स्वत: घडविले पाहिजे व आपल्या सर्वांगीण विकासासाठी आपला आर्थिक स्तर उंचविला पाहिजे असे मत सहस्त्रशक महिलांची प्राकृतिक, सामाजिक व परिवर्तनात्मक प्रगती या विषयावरती आयोजित व्याख्यान मध्ये मुख्य अतिथी म्हणून बोलताना पंकजा इंगळे यांनी व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख, मुख्य अतिथी प्रा .डॉ. पंकजा इंगळे, डॉ .एन.के.रामटेके ,डॉ.राजेश पाटील उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.डॉ. पंकजा इंगळे यांनी आपल्या जीवनामध्ये आलेले अनुभव व्यक्त करताना संघर्ष हा प्रत्येकाचा जीवना मध्ये येत असतो. संघर्षाला प्रश्न म्हणून नव्हे तर संधी म्हणून स्वीकार करून आयुष्याचे सोने करावे. एक महिला म्हणून स्वत: सक्षम असताना इतर महिलांन वरती अन्याय, अत्याचार, शोषण होत असताना दिसल्यास त्या वरती एक आपली नैतिक जबाबदारी म्हणून आपण आवाज उचला पाहिजे. आज ही सामाजिक स्तरावरती महिलांना अबला म्हणून पाहिले जाते महिला या पुरुषावरती अवलंबून आहे अशी भावना काही ठिकाणी दिसून येते ही परिस्थिती बदलविण्या करिता महिलांनी आर्थिक स्तरावरती सक्षम होणे गरजेचे आहे.

येणाऱ्या काळ हा एआय चा आहे या नंतर चा नोकरी च्या संधी ह्या एआय आणि कौशल्य वरती आधारित असणार आहे त्याच बाबी लक्ष्यात घेता अमरावती मध्ये ह्या वरती आधारित नोकरी चा संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत याच लाभ घ्यावा असे आवाहन प्रा. पंकजा इंगळे यांनी केले. यावेळी अध्यक्ष मनोगता मध्ये प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांनी जेव्हा महिलांवरती होणारे अत्याचार, बलात्कार, लैगिंक शोषण बंद होईल व प्रत्येक महिलेला शिक्षणाचा, समानतेचा अधिकार प्राप्त होईल तेव्हा खऱ्या अर्थाने महिला दिवस आपण साजरा करू असे प्रतिपादन त्यांनी केले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील पुरुष कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आले व या सोहळ्याच्या निमित्याने महाविद्यालयातील कार्यरत महिला प्राध्यापक, कर्मचारी यांचे सन्मान उपस्थिती मान्यवरांचा हस्ते करण्यात सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल्ल घवळे, संचालन मयूर चौधरी यांनी केले तर प्रा. डॉ. एन.के.रामटेके यांनी आभार मानले. महाविद्यालयात कार्यरत सर्वच महिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचा येथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महिला दिनी महिला पोलीस कर्मचारी, महिला पोलीस पाटलांचा सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.10 )** - शिरखेड पोलिस स्टेशनमध्ये महिला पोलिस कर्मचारी व महिला पोलिस पाटील यांचा 8 मार्च महिला दिनी शाल व भेटवस्तू देउन शिरखेड ठाणेदार सचिन लुले यांचे हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

शिरखेड पोलिस स्टेशन व नेरपिंगळाई येथील महिला अल्पजा बडासे आणि रमा इंगळे यांच्या महिला ग्रुप मार्फत 8 मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ.माधवी वानखडे व प्रमुख पाहुणे म्हणून ठाणेदार सचिनजी लुले अँड.शुभम गाडे, दुय्यम ठाणेदार राहुल गवई, पीएसआय ठाकरे यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात केली. यावेळी मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

त्यात ठाणेदार सचिन लुले यांनी महिला दिनी महिलांना मोलांचे मार्गदर्शन केले. सत्कार सोहळ्यात महिला पोलिस कर्मचाऱ्यांसह निवृत्त पोलिस पाटीलांचा सुद्धा यावेळी सत्कार व सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला पोलिस कर्मचारी व पोलिस पाटील उपस्थीत होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अल्पजा बडासे, रमा इंगळे, शिरखेड पोलीस स्टेशनचे खुपीया पोलीस कर्मचारी वैभव घोगरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन नेरपिंगळाईचे पोलीस पाटील राजेश राऊत यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात महिला पोलिस कर्मचारी, महिला सामाजिक कार्यकर्त्या आणि महिला पोलीस पाटील आणि पत्रकार मंडळी उपस्थित होते .

# प्रशासनाचे लेखी आश्वासन निघाले फसवे



**अजय चौधरी ठोठाविणार न्यायालयाचे दार**

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.10 )** - आपल्या विविध मागण्यांकरिता बेमुदत उपोषण छेडणारे अजय चौधरी यांना प्रशासनाने त्यांच्या मागणीच्या पुर्ततेसंबधात लेखी आश्वासन दिले. त्यानंतर चौधरी यांनी आपले उपोषण मागे घेतले. मात्र या आश्वासनाची पुर्तता प्रशासनाकडून करण्यात आली नसल्याने हे आश्वासन फसवे असल्याचे चौधरी यांचे म्हणने आहे, त्यामूळे न्यायालयाचे दार ठोठावून आपण न्याय मागणार असल्याचा इशारा चौधरी यांनी दिला आहे.

चौधरी यांनी जुलै 2024 मध्ये तहसिल कार्यालयासमोर बेमुदत उपोषण झेडले होते. 6 दिवस चाललेल्या या उपोषणात उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, ठाणेदार व विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त बैठक घेऊन उपोषणाच्या मागण्या पूर्ततेसंदर्भात लेखी आश्वासन दिले होते. त्यामुळे चौधरी यांनी उपोषण मागे घेतले खरे, परंतु काही मागण्यांची आजपावेतो पुर्तता करण्यात आलेली नसल्याचे चौधरी यांचे म्हणणे आहे. वरुड शहर व तालुक्यात अवैध धंदे जसे ऑनलाईन लॉटरी, वरली मटका, जुगार, अवैध दारु विक्री यावर नियंत्रण हे विषय जसेच्या तसेच आहेत.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला असताना त्यावर पोलिसांकडून कुठलीही कारवाई झाली नाही, उलट अवैध धंदे वाढीस लागले. सदर अवैध धंद्यासंदर्भात वारंवार प्रश्न उठविल्यामुळे माझ्या जिवितास धोका निर्माण झालेला आहे. या संदर्भातही स्थानिक पोलिसांत अर्ज सादर केलेला होता. परंतु त्यालाही केराची टोपली दाखविण्यात आली. सदर उपोषणात समन्वय समितीची घोषणा करून दर महिन्याला उपविभागीय अधिकारी यांचे समक्ष समन्वय समितीच्या माध्यमातुन स्थानिक नागरिकांच्या समस्या व अडचणी ऐकण्यात येतील याकरीता समन्वय सभेची घोषणा सुध्दा करण्यात आली होती. परंतु या समन्वय समितीला कार्यान्वित करण्यातच आले नाही. त्यामूळे नागरिकांच्या समस्या जैसे थे आहेत, उलट दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामूळे या वेळ मारुन नेणाऱ्या लेखी आश्वासनाविरुध्द न्यायालयात दाद मागण्याकरिता याचिका दाखल करणार असल्याचा इशारा चौधरी यांनी दिला आहे.

# महिला दिनानिमीत्त मेंहदी उपक्रम

## सुरभि आर्ट चे आयोजन




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )** - विदर्भातील सर्वात मोठी कापड बाजारपेठ बिजीलँड येथे संस्कार शॉपिंग मॉलमध्ये महिला दिनानिमित्त सुरभि आर्टच्या सुरभि जैसवाल त्यांचे सहकारी शिवानी क्षीरसागर व प्राची इमले यांनी मेहंदी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात अनेक महिलांनी सहभाग घेतला. महिलांनी आपल्या हातांवर सुरेख मेहंदी डिझाईन्स काढून घेतल्या. या उपक्रमामुळे महिलांना एकत्र येण्याची आणि आपल्या सांस्कृतिक परंपरेचा आनंद लुटण्याची संधी मिळाली. सुरभि आर्टच्या या उपक्रमामुळे महिलांच्या कलागुणांना वाव मिळाला आणि आपल्या हातांवर विविध प्रकारच्या मेहंदी डिझाईन्स साकारण्याचा आनंदही आला. या कार्यक्रमामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ झाली. त्यांनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे महिलांना एकत्र येण्याची, कला कौशल्य वाढवण्याची आणि सांस्कृतिक परंपरेचा आनंद लुटण्याची संधी मिळते. सुरभि जैसवाल यांच्या या उपक्रमाचे महिलांनी कौतुक केले.

# रविकांत तुपकर यांनी घेतली ठाकरे कुटूंबियांची सांत्वनापर भेट

## बँकांचा तगादा आणि कर्जाच्या विवंचनेने घेतला मंगेशचा बळी



### कुटूंबियांचे मत

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड( दि.10 )**- शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी नुकतील आत्महत्याग्रस्त शेतकरी मंगेश ठाकरे यांच्या कुटूंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी कुटूंबियांनी त्यांना सांगितले की, बँकांचा तगादा आणि कर्जाच्या विवंचनेने मंगेशचा बळी घेतला.

तालुक्यातील जरुड येथील मंगेश ठाकरे या 47 वर्षीय शेतकऱ्याने हातचे पीक गेल्याने व बँकांची वसुली सुरु झाल्यामुळे शुक्रवार दि. 7 मार्च रोजी आपली जिवनयात्रा संपविली. मंगेशच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर कुठाराघात झाला, त्यांच्यावर अवलंबून असलेल्या दोन मुले निकुंज, भाविका आणि पत्नी मिनलची मात्र वाताहत सुरु झाली. घरातील कर्ता पुरुषाच्या मृत्यूनंतर हे अख्खे कुटुंब वाऱ्यावर आले आहे. मंगेश यांचा मोठा मुलगा निकुंज 9 वि ला तर मुलगी भाविका 6 वि ला शिकत आहे. नापिकीमुळे घरात अठराविश्वे दारीद्र याच काळजीपोटी आणि पंजाबराव बँकेच्या वसुलीचा तगादा या विचारातून आलेल्या नैराश्यातून मंगेशने मृत्यूला कवटाळले. त्यांचेकडे केवळ अडीच एकर कोरडवाहू शेती यामध्ये तूर पेरली मात्र निर्सगाने साथ दिली नाही तूर पुर्णपणे बुडाली तर त्यांचेवर पंजाबराव बँकेचे कर्ज दीड लाख रूपये, ट्रॅक्टरचे एक लाख रूपये, जिल्हा बँकेचे 27 हजार, डेबूजी बँकेचे 40 हजार असे तीन साडे तीन लाखाचे कर्ज मंगेशवर होते असे मृतक मंगेशच्या नातेवाईकांनी सांगितले, त्या कर्जाची परतफेड करण्यासाठी मंगेश तसुभरही डगमगला नसता परंतु सतत कर्जाची वसुली करणारे अधिकारी मात्र मंगेशचा पिछा सोडत नसल्यामुळे नाईलाजास्तव मंगेशला आत्महत्या करावी लागली, असे कुटुंबीयाचे म्हणणे आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करावी व मृतक मंगेशच्या कुटुंबाला न्याय मिळवून दयावा अशी मागणी सुध्दा मंगेशच्या कुटुंबीयांनी रविकांत तुपकर यांच्या भेटी दरम्यान केली आहे. यावेळी अमित अढाऊ, शैलेश ढोबळे, उमेश डबरासे, भगवंता वानखडेसह गावातील नागरीक मोठया संख्येने उपस्थीत होते.

# गरिब आहे, मात्र हक्काची जागा नाही, तर घरकुलही नाही!

## साहित्यांचे भाव वाढले, तरीही घरकुल अनुदान तेवढेच

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.10 )**- विविध योजनेअंतर्गत गरजु व्यक्तींना घरकुल अनुदान दिले जाते. मात्र या अनुदानामध्ये खरच त्यांचे घरकुल बांधणे होते का? हा प्रश्न आहे. काही नागरिक असे आहे की, त्यांचे घरकुल यादीत नाव आहे. मात्र आता पर्यंत ओबीसी चे टार्गेट न आल्याने 30 ते 35 वर्ष पडक्या घरात वास्तव केले. घर पडायला आले, त्यामुळे उधार किंवा थोडे-थोडे पैसे वाचून घर बांधले, मात्र आता त्यांचे घरकुल यादीत नाव आले. खुली जागा नाही व आरसीसी बांधकाम असल्याने घरकुल चे अनुदान मिळत नाही. प्रशासनाच्या या धोरणाप्रती नागरिकांना प्रचंड रोष पहायला मिळत आहे. घरकुल बांधकामासाठी 1 लाख 50 हजार वाढीव 2 लाख 10 हजार पर्यंत अनुदान दिले जाणार आहे. मात्र गावोगावी घरकुल यादीत नाव आहे. मात्र खुली जागा नाही



अश्या लाभार्थी यांना घरकुल अनुदान पासून वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे आता दुसऱ्या लाभार्थी यांना घरकुल चा लाभ मिळणार आहे. गाव पातळीवर मात्र अनेक लाभार्थी हे राजकीय व्यवस्थेचे बळी पडत आहेत. घरकुल मिळणार या आशेवर असलेले अनेकजण यांच्याकडे खुली जागा आपल्या नावे करून ठेवत आहे.

### अनुदान च्या दुप्पट कर्ज

घरकुल योजनेच्या माध्यमातून जेवढे अनुदान मिळत तेवढे अनुदानमध्ये घर बांधणे होत नाही. याउलट वाढत्या महागाई मध्ये अनुदान च्या दुप्पट कर्ज ही लाभार्थ्यावर होते. ग्रामीण भागात मोलमजुरी करणारे नागरिक यांची संख्या आहे. घरी लग्नाच्या मुली असल्याने कसे तरी घर बांधले. आता पर्यंत ओबीसी चे टार्गेट येत नव्हते आता आले तर लाभ मिळत नाही. घरकुल अनुदानसाठी मुलीचे, मुलाचे लग्न थांबवणे योग्य नव्हते. त्यात गाव पातळीवर राजकारण मुळे अनेक लाभार्थी हे घरकुल अनुदान पासून वंचित राहणार आहे.